॥ श्री ॥
॥ बाबा ॥

शेगांवीच्या राणा तुला बाबांच वरदान
एकमुखानं बोला बोला बाबा गजानन ॥ धृ.॥

बंकटलालाघरी वास्तव्य तू रे करी
जान्हवरावानांही तीर्थाने बरा करी
तुज वंदावया येती हो भक्तगण ॥1॥

पौर्णिमेला अडगावी भंडारा हो झाला
भास्करांच्यासाठी हाकी रे कावळयांना
ब्रम्हगिरीचा केला तू दूर अभिमान ॥2॥

सोमवतीचे पर्व आले हो माघमासी
नर्मदाच आली ऋषींना वंदण्यासी
अविनाशी हे ब्रम्ह स्वामी माझे गजानन ॥3॥

★★★★★